Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2407II03V12P0030

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE July'2024
Issue–II(III), Volume–XII

# किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची जाणीव : एक सामाजिक दृष्टिकोन

**प्रा. मनिषा पाटील (पाचभाई )**
(**बी.ए. मानसशास्त्र, समाजशास्त्र, बी.एड, एम.ए. संप्रेषण, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र**, (A)
**एम.एस.समुपदेशन**)
**य. च. मु. मुक्त विद्यापीठ पनवेल (माजी प्राध्यापक**)
**ईमेल**:- manishapachbhai@gmail.com
**मोबाईल क्रमांक** :- 9082669586

**१.१ प्रास्ताविक / पार्श्वभूमी**

लहान मुला मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची जाणीव नसते. असे असले तरी ब-याच किशोरवयीन मुलींना चांगले वाईट स्पर्शातील फरक कळतो. व ते कळण्याची संवेदना प्रत्येक जीवनमध्ये जन्मतः असते. मानव वनस्पती व प्राणी यांना ही या स्पर्शाची जाणीव आहे.

चांगला स्पर्श, वाईट स्पर्श कळायलाच हवा. तेवढी जागरुकता त्यांच्यात निर्माण व्हावी. आपल्याला जन्मतः च नैसर्गिक वरदानच दिलेले आहे. चांगला, वाईट स्पर्श ओळखण्याचे. पण एखादे वेळी चटकन लक्षात येणार नाही. चांगला स्पर्श तर जन्माला आल्यापासून च कळतो. उदा:- लहान मुलांना वाईट स्पर्श कळतो म्हणून मुले त्यांच्या कडे जात नाही. जबरदस्तीने घेतले तर रडतात. परंतु वाईट स्पर्शाच्या जाणीवा लवकर कळत नाहीत. उदा:- आईचा स्पर्श, बाबांचा स्पर्श, आजी आजोबांचा स्पर्श, भावंडांचा स्पर्श, मित्र मैत्रिणींचा स्पर्श ....व सर्वात महत्त्वाचा अनोळखी व्यक्तीचा स्पर्श इ.

आज समाजात नको तितके स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे काही किशोरवयीन मुले लैंगिकदृष्ट्या काही समानलिंगाच्या तर काही सर्व लिंगाच्या लोकांकडे आकर्षित होतात. आपण काय करत आहोत याची त्यांना जाणीव राहिली नाही. व परिणामाची चिंता म्हणावी तितकी नाही. व समजून घेण्यासाठी आजिबात स्वारस्य नाही.

**महत्वाची शब्दावली :-** Adolescent girls, Good and Bad touch, Self defense

**१.२ महत्त्व :-**

मुलींना **१२** ते **१९** वर्षे वयोगटातील किशोरवयीना दररोज खऱ्या अर्थाने चिंतेचा सामना करावा लागतो. कारण त्यांच्या आयुष्यातील वाढीचा हा सर्वात महत्त्वाचा व त्रासदायक टप्पा असतो. या काळात, किशोरांना काही जबरदस्त बाह्य आणि अंतर्गत संघर्षांचा सामना करावा लागतो. ते संप्रेरक बदल, शरिरातील बदल, तारुण्य, सामाजिक आणि पालकांचा दबाव, अभ्यास आणि शाळेतील दबावला त्यांना सामोरे जावे लागत असते . अनेक किशोरांचा गैरसमज होतो . त्यांच्या भावना आणि विचारांचा विचार

करणे आणि त्यांच्या पालकांकडून मार्गदर्शन होणे अत्यावश्यक आहे. पालकांनी त्यांच्या मुलांशी संपर्क साधणे आवश्यक आहे, जे किशोरवयीन वाढीच्या समस्यांशी निगडित आहेत, काळजीपुर्वक आणि मैत्रीपूर्ण रीतीने. चर्चा होणे आवश्यक आहे.

कारण किशोरवयीन मुलांची लैंगिकता पालकांच्या किशोरवयीन वेळेपेक्षा व अपेक्षांपेक्षा वेगळी असु शकते. अशा वेळी मुलींना मारणे ओरडणे किंवा इतर शिक्षा देणे म्हणजे त्यांच्या मनात तुमच्या विषयी कटुता निर्माण करणे होय. त्यापेक्षा ती अवस्था तुम्ही कशा पद्धतीने स्वीकारता व मार्ग शोधता यावर मुलांचा विकास व तुमचे नातेसंबंधातील गोडवा व विश्वास अवलंबून असतो.

**१.३ गरज :-**

मानसिक भावनिक कौटुंबिक सामाजिक भान वेळच्या वेळी येणे ही तितकेच गरजेचे आहे. आजची परिस्थिती पाहता लहान मुलींपासून ते वयोवृद्ध महिला देखील बलात्कार व वाईट स्पर्शाच्या शिकार झाल्या आहेत. म्हणून मुलींना समज यायला लागली की स्पर्श व लैंगिक शिक्षणाची गरजेपुरती माहीती व प्रशिक्षण मुलींना देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. दुर्दैवाने काही मुलींना आई वयात येताना योग्य मार्गदर्शन देते. परंतु मुलांना वयात येताना वडील किंवा मोठा भाऊ यांच्या मार्गदर्शनाची कमतरता आहे. त्यामुळे मुले नको त्या माध्यमातून माहिती मिळवण्यासाठी प्रयत्न करतात.

हल्ली १० - १२ वर्षांची मुले आश्चर्यकारकपणे हुशार आहेत. फक्त स्पष्ट करावे की स्पर्श हा चांगला व वाईट स्पर्श कसा ओळखावा. तिच्या वयात, कोणीही तिच्या खाजगी अंगाला स्पर्श करू नये. तिने कोणालाही स्पर्श करू नये. हातात हात मिळवणे टाळावे. खांद्यावर हात किंवा मिठी मारणे देखील ठीक आहे, जोपर्यंत तिला ते किळसवाणे किंवा खटकत नाही. हा काळ धोकादायक आहे. यात लैंगिक विकास होत असल्याने तो स्पर्श तीला नकळतपणे हवाहवासा सुद्धा वाटू शकेल. त्यामुळे पालकांनी वेळीच सतर्क असणे गरजेचे आहे.

**१.४ गृहितके :-**

१) सद्य: स्थितीत किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची जाणीव असेलचं असे नाही
२) किशोरवयीन मुलींकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन भिन्न आहे.

**१.५ उद्दिष्टे:-**

१) मुलींकडे बघण्याचा आजच्या पिढीचा दृष्टीकोन काय आहे हे जाणून घेणे.
२) किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची जाणीव आहे का ते जाणून घेणे.
३) भारतीय संस्कृतीत कोणत्या स्पर्शाला किती महत्त्व द्यावे याची समज निर्माण करणे.
४) किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शामुळे भविष्यात येणाऱ्या समस्यांची जाणीव करून देणे.
५) किशोरवयीन मुलींना वाईट स्पर्शाला कसे सामोरे जायचे यावर उपाय सुचवणे.

**१.६ संशोधनाची परिकल्पना :**

१) किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची समज नसल्याने समस्या उद्भवतात.
२) किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची जाणीव करून दिली तर मुलींमध्ये सतर्कता येईल.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2407II03V12P0030

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE July'2024
Issue–II(III), Volume–XII

**१.७ संशोधनाची प्रश्नार्थक परिकल्पना :**

१) किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची समज करून देणे गरजेचे का आहे?

२) किशोरवयीन मुलींमध्ये सर्व सामान्य समस्या कोणत्या आहेत?

३) किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाचे मार्गदर्शन कोणत्या वयापासून करावे?

४) किशोरवयीन मुलींना लैंगिक शिक्षण देणे कितपत गरजेचे आहे ?

५) किशोरवयीन मुली व पालकांमध्ये संवाद सुधारण्यासाठी कोणते धोरण असणे आवश्यक आहे?

५) मुली व स्त्रियांकडे बघण्याचा सामाजिक दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे का?

६) किशोरवयीन मुलींनी समवयस्कांच्या दबावाला व  असुरक्षितता वाटणा-या व्यक्तीला कसे सामोरे जायचे?

७) किशोरवयीन मुलींना चांगले वाईट स्पर्श व देहबोलीची समज करून देण्यासाठी उत्तम उपाययोजना कोणत्या?

**१.८ संशोधनाची कार्यवाही:**

१) सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

२) सदर संशोधनासाठी धाराशिव जिल्ह्यातील किशोरवयीन ४५ मुली मुलांच्या प्रतिसादांचा समावेश करण्यात आला आहे.

३) सदर संशोधनाच्या माहिती संकलनासाठी २० प्रश्न असलेल्या प्रश्नावली चा वापर करण्यात आला आहे.

४) उपाययोजनेसाठी मुलाखत व व्याख्यान पद्धती तंत्राचा वापर केला.

५) सदर संशोधनात प्राप्त माहितीवर सांख्यिकी संस्कार करण्यासाठी शेकडेवारी तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

६) सदर संशोधनाचे शेकडेवारी तंत्राच्या साहाय्याने निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**१.९ निष्कर्ष :-**

१) मुलींना व पालकांना स्वातंत्र्यांचा खरा अर्थ कळलेलाचं नाही. स्वातंत्र्य म्हणजे स्वतःची आत्मसन्मान, आत्मविश्वास व आत्मउन्नती चे स्वातंत्र्य आहे याची जाणीव करून देण्याची गरज वाटते.

२) मुलांना कष्ट व ख-या गरजा काय आहेत हे समजण्या आधिचं  वाजवीपेक्षा जास्त मिळत गेले आहे. त्याचा दुष्परिणाम म्हणून कोणत्याही जाणीवा जिवंत नाहीत.

३) आजच्या पिढीला सहनशक्ती नाही. व धीरही नाही.

४) अजुनही बोटावर मोजता येतील इतक्या लोकांना मुली ह्या उपभोगाची वस्तू आहे असे वाटते.

५) पालक ही देश तसा वेश असे न मानता पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्यात धन्यता मानतात.

६) मुलींना स्वतःची कामे, मासिक पाळीतील स्वच्छता, याची जाणीव व गरजेपुरती देखील माहीती नाही.

७) हट्ट व जिद्द पुर्ण करण्यासाठी आत्महत्येची भिती किंवा दोन दोन दिवस उपाशी राहून स्वतः चे म्हणने खरे करतात.

८) पालकांनासून महत्त्वपूर्ण गोष्टीं लपवणे. भितीपोटी किंवा आईवडील शिक्षा करतील म्हणून.

९) समाजात योग्य वयात योग्य समज न आलेल्या मुलींकडे तीला समजून घेण्याची क्षमता दाखवत नाहीत तर तीला वेगळया नजरेने किंवा दृष्टीकोनातून पाहिले जाते.

१०) समाजात विनयभंग केल्याप्रकरणी शिक्षा व त्यातून पळवाटा खूप आहेत.

११) एडगर गेलच्या शंकुनूसार पाहण्यातून ८३ टक्के, ऐकण्यआतून ११ टक्के, स्पर्शातून ३.५ टक्के, गंध ज्ञानातून १.५ टक्के, व रस ज्ञानातून १.० टक्के शिकत व अनुभवत असतो.

म्हणजेच स्पर्शातील फरक हा जुन्या व नवीन अनुभवातून ३.५ टक्के मिळत असतो. व त्याचे स्मरण ठेवून तो स्पर्शाची आवड व निवड जपतो. व वाईट  नकोशा वाटणाऱ्या स्पर्शापासून सतर्क व दूर  राहतो असे म्हणावे लागेल.

**१.१० प्रमुख निश्कर्ष :-**

१) ५० % मुलींना कोणतीही तडजोड नको. व जे हवे आहे ते पाहीजेचं. हा हट्ट दिसतो.
२) ७० % मुलींना  कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांची भिंती किंवा आदर व मर्यादा शिल्लक नाही.
३) ५५ % कुटुंबातील नातेसंबंधात प्रेम जिव्हाळा कुठेतरी कमी होत आहे. त्यामुळे सुसंवाद थांबला आहे.व त्याचा दुष्परिणाम होत आहे.
४) ६० % कुटुंबात कुठेतरी भावनांची अभिव्यक्ती थांबली आहे.
५) ७५ % समाजातील मृगजळातील स्टेटस च्या विळख्यात किशोरवयीन मुले भरडले जात आहे.
६) ५० % पालक नोकरी निमित्त घराबाहेर जाणारे असल्याने म्हणाला तसा मुलींना समजून घेण्यासाठी वेळ देऊ शकत नाहीत.
७) ७० % मुलींना चांगल्या व वाईट स्पर्शातील फरक कळत नाही.
८) ७४ % मुलींना स्पर्श व लैंगिक शिक्षण देण्याची गरज आहे.
९) ३६ % मुलींना प्रत्येक स्पर्शाची व देहबोलीची समज आहे.
१०) ५५ % पालकांना मुलीशी कसे समायोजन करावे हे  सांगण्याची गरज आहे.
११) ६० % मुलींना त्यांना स्वातंत्र्याचा अर्थ, व मुलगा आणि मुलगी व त्यांचे सामाजिक दृष्टीने भान, भावभावनांचे प्रदर्शन, व मर्यादा समजून सांगण्याची गरज आहे.
१२) ७०%  पालकांना आपल्या मुली अजून लहान आहेत व त्यांना काही कळत नाही असे वाटते.
१३) १५% मुलीं कुटुंब, मैत्रिणी इत्यादी च्या संस्कारामुळे सतर्क व हुशार आहेत. त्या फसण्याची शक्यता नाही.
१४) २५% पालकांचे आपल्या मुलींमध्ये योग्य दिशेने लक्ष आहे. व योग्य संस्कार ही होत आहेत.
१५) १०% अतिशय समजदार व हुशार आहेत. त्या स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सक्षम आहेत.
१६) ३३% पालकांना मुलींचे पालन-पोषण योग्य रितीने व्हावे असे मनापासून वाटते. पालकांना 'किशोरवयीन मुलींना चांगल्या वाईट स्पर्शाची जाणीव' या व्याख्यानास छान प्रतिसाद मिळाला.

**१.११ उपाययोजना :-**

१) ज्यामुळे मुलांना व मुलींना त्यांच्या पालकांशी बोलण्यास सोयीस्कर वाटते. मित्र आणि पालक यांच्यात योग्य संतुलन शोधणे महत्वाचे आहे.
२) वाईट स्पर्श कित्येकदा मुलींना गोंधळात टाकणारे असतात. व अस्वस्थ करणारे असतात.
उदा:- कोणीतरी मुलांच्या खाजगी भागात स्पर्श करत असतो. तेव्हा त्यांना नेमकं काय करायचं ते सुचत नाही. अशावेळी कोणाला तरी सांगावे.
३) कोणीतरी वाईट हेतूने स्पर्श करत असतो व तो मुलींना नैसर्गिक च नकोसा वाटत असतो. तेव्हा प्रतिकार करण्याची क्षमता निर्माण करावी.
४) कोणीतरी अचानक चुंबन घेणे. अशा वेळी जीथे सुरक्षित वाटत नाही. अशा ठिकाणी एकटं जावू नये

५) ओळखीच्या व जवळच्या लोकांचे स्पर्श कळतात. व त्यांच्या देखील स्पर्शात फरक पडला तर तो देखील कळत असतो. अशा वेळी मला हे आवडलं नाही. असं स्पष्ट सांगावे. व कुटुंबात सुचना द्या.

६) तसेच अनोळखी लोकांचे स्पर्श चांगले किंवा वाईट असू शकतात. तरी देखील एका हाताच्या अंतरावर ठेवून च वागावे.

७) मुलींची ऐकण्याची मनस्थिती नसताना तर्क वितर्क लावण्यापेक्षा सहानुभूती दाखवा.

८) तुमच्या किशोरवयापासून ते आत्तापर्यंतच्या नातेसंबंधातील समस्येवर त्यांच्याशी चर्चा करा.

९) तुम्ही त्यांच्याशी बोलण्यासाठी कधीही उपलब्ध आहात हा विश्वास द्या.

१०) किशोरवयीन मुलींना तुमच्या बद्दल आदर वाटावा असे वर्तन ठेवा.

११) कळायला लागल्यापासून च प्रत्येक हट्ट पालकांनी पुरवणे कमी करावे.

१२) आत्महत्या किंवा अन्य काही भिती दाखवत असतील तर त्यांच्या चुकीच्या वर्तनाची त्यांना वेळीच जाणीव करून द्यावी.

११) स्व-संरक्षणासाठी प्रशिक्षण द्यावे. व मर्म ज्ञान द्यावे.

१२) आत्म सन्मान, शरीर प्रतिमा, वाढता तणाव, समवयस्कांचा दबाव, शाळेतील शिक्षकांचा गैरव्यवहार, मासिक पाळीतील समस्या, विरूद्ध लिंगी आकर्षन, देहबोली व डोळ्यांचे इशारे, लैंगिक गरजेतून निर्माण होणार-या समस्या, नको तिथे कोणाला तरी घाबरून गप्प बसण्याची सवय व त्यांचे अनिष्ट परिणाम, या संदर्भात व्याख्यान व प्रशिक्षण द्यावे.

१३) त्या त्या वयातील जबाबदाऱ्या व मर्यादा वेळीचं किशोरवयीन मुलामुलींना शिकविणे व समजत नाही तोपर्यंत सहनशीलता ठेवून समजावणे.

१४) कुटुंबातील समस्यांकडे समस्या म्हणून न पाहता प्रत्येकाचा स्वभावधर्म व धनात्मक दृष्टीने पाहायला शिकवणे.

१५) मुलींसोबत घडणाऱ्या चांगल्या वाईट गोष्टी कोणाजवळ तरी तात्काळ बोलून दाखवणे किती महत्वाचे आहे. व प्रत्येक मुलीजवळ असे दोन तीन जीवाभावाच्या वाटणा-या व्यक्ती असणे आवश्यक आहे. त्यासाठी पालकांना, भावंडांना, शिक्षकांना, माऊशी किंवा आत्या किंवा जवळचा वाटणारा नातेवाईक इत्यादीना कधी राग आला तरी त्यांना समजून घेण्याची क्षमता, योग्य वेळी योग्य मार्गदर्शन, व तुमच्याबद्दल कायमस्वरूपी विश्वास वाटला पाहिजे.

१६) समाजातील मुलींची मर्यादा व मुलींमार्फत सुप्रजेचे निर्माण होते त्यामुळे मुलींचे शील संवर्धन व मुलींचा पदर सांभाळण्याची जबाबदारी समाजातील नागरिकांची देखील आहे हे महत्त्व पटवून देण्यासाठी उद्बोधन व समाज प्रबोधन कार्यक्रमाची निर्मिती करणे गरजेचे आहे.

१७) समाजात विनयभंग केल्याप्रकरणी शिक्षा ही निंदनीय व कठोर पाहिजे व तटस्थपणे निभावून नेण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. जमीन किंवा लाचं न स्वीकारता सर्वांसाठी सारखी पाहिजे. आणि कोर्टाने निर्णय तातडीने घेतले पाहिजे. व कोणत्याही परिस्थितीत कोणालाही सुट मिळता कामा नये. म्हणजे समाजात थोडी का होईना भिती निर्माण होईल.

१८) चुकून एखादी दुर्दैवी घटना घडली तर त्याचा बाऊ न करता कुटुंब व समाजाने त्यामागील पार्श्वभूमी समजून घेवून स्वीकार करून मनाचा मोठेपण दाखवून नव्याने जगण्यासाठी मदत करावी.

१.१२ संदर्भ सूची :-

१) डॉ. सौ. इंदूमती टी. , डॉ. सौ. सपकाळे, आरती पी., डॉ. भांडारकर, अविनाश ओ., डॉ. सौ. पाटील, पुष्पा जी., प्रा. जगताप, मनिषा वसंतराव., प्रा. चौधरी, दिलीप झेड. (२०१२ - १३): ' शैक्षणिक संशोधन पद्धती' एम. ए. शिक्षणशास्त्र (प्रथम वर्ष), कुलसचिव उ. मी. वि., जळगाव.

२) डॉ. सोहनी, चित्रा (मे २००६) : प्रायोगिक संशोधन पद्धती, प्रभारी, कुलसचिव, य.च.म.मु.विद्यापिठ, नाशिक ४२२ २२२.

३) डॉ. पोखरापूरकर, राजा ( मे २००६ ) : संशोधनासाठी नमुना निवड, प्रभारी, कुलसचिव, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२.

४) डॉ. जोशी, अनंत व महाले, संजीवनी ( आॅगस्ट २००५) : संशोधन अहवालाची लेखन पद्धती, प्रभारी, कुलसचिव, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२.

५) प्रा.सोमण, मा. शं. (१ जाते.२००८): सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

६) पाटकर, अरविंद घ. (२५एप्रिल १९९७): कथा पालकांच्या व्यथा मुलांच्या, मनोविकास प्रकाशन, चर्चगेट मुंबई ४०० ०३२.

७) सरश्री, ( एप्रिल २०१२) : आई-वडील-मुलं आणि मोह, तेजग्यान ग्लोबल फाऊंडेशन, पुणे ४११ ०३०.

८) डॉ. सरदेसाई, हे. वी. (२ एप्रिल २००२): घरोघरी ज्ञानेश्वर जन्मती, उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४.

९) केसलर, आरसी, फॉस्टर, सीएल, सॉंडर्स, डब्ल्यूबी, आणि स्टॅंग, पीई (1995). मानसिक विकारांचे सामाजिक परिणाम, I: शैक्षणिक प्राप्ती. *अमेरिकन जर्नल ऑफ सायकियाट्री*, *152* (7), 1026-1032

१०) फर्ग्युसन डीएम**,** वुडवर्ड एलजे**,** हॉरवुड एलजे**.** पौगंडावस्थेतील आणि प्रौढत्वाच्या सुरुवातीच्या काळात आत्महत्येच्या वर्तनाच्या प्रारंभाशी संबंधित जोखीम घटक आणि जीवन प्रक्रिया**.** मानसशास्त्रीय औषध**.2000;30 (1):23–39.**